**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

दिनांक 27/06/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## विश्वासघात

पो.स्टे. केळवद :— अंतर्गत २० किमी अंतरावर मौजा जंगली बोरगाव शिवार माऊली क्रेशर गिट्टी खदान येथे दिनांक २५/०६/२०२३ चे ०२/०० वा. ते दि. २५/०६/२०२३ चे ०५/३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— संजीव शंकर आव्हाड, वय ६० वर्ष, रा. ४०६ कावेरी अपार्टमेंट कैलास नगर, वालीवली बदलापुर तह. अंबरनाथ जि. ठाणे ह. मु. जंगली बोरगाव शिवार यांच्या माउली क्रेशर गिट्टी खदान येथे काम करणारे **आरोपी क्र. १) नामे— हिसाब अली रा. अभयनगर, बारुपारा पो.स्टे पाराशिपारा जि. नाडीया कोलकत्ता (पश्चिम बंगाल)** याने व त्याचे सोबत काम करणारे आरोपी क्र. **२) असराफोल सरफोल वय १९ वर्ष, रा. लोकाथपुर मुर्शीदाबाद (पश्चिम बंगाल) ३) सुमन महिम शेख, वय २३ वर्ष रा. लोकाथपुर, मुर्शीदाबाद (पश्चिम बंगाल) ४) सनसार होसेन वय ४८ वर्ष, रा. बारुपारा, अभयनगर बारुपारा (पश्चिम बंगाल) ५) जाकीर शेख वय २५ वर्ष रा. नाडीया (पश्चिम बंगाल) ६) रजाक शेख वय २४ वर्ष रा. नाडीया (पश्चिम बंगाल) ७) मिंटु महाराम मंडल वय २४ वर्ष रा. नाडीया (पश्चिम बंगाल)** यांनी दि. २५/०६/२०२३ चे ०२/०० वा. ते दि. २५/०६/२०२३ चे ०५/३० वाजता दरम्यान संगनमत करुन फिर्यादीच्या कंपनीमधील पॉवरस्क्रीन टॅरेक्स क्रेशर मशिनचे स्पेअरपार्ट १) जॉ कोन, स्क्रीन यांचे पी. एल. सी ०३ नग प्रत्येकी अंदाजे ५,००,०००/— रुपये प्रमाणे एकुण १५,००,०००/— रुपये २) ३ नग कपलिंग अंदाजे प्रत्येकी २,००,०००/— रुपये प्रमाणे एकुण ६,००,०००/— रुपये ३) १३०० पॉवर कोनचा आतला डिस्प्ले अंदाजे किंमत ४,००,०००/—रुपये ४) ०३ नग पंप अंदाजे प्रत्येकी १५,००,०००/— रुपये प्रमाणे एकुण ४५,००,०००/— रुपये व नगदी १०,००,०००/— रुपये असा एकुण ८०,००,०००/— रुपयाचा मुद्देमाल घेऊन जाऊन फिर्यादीचा विश्वासघात केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन केळवद येथे आरोपीतांविरुध्द कलम ४०८, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमितकुमार आत्राम पोस्टे केळवद मो. क्र. ९४०५१९४३१७ हे करीत आहे.

## कोळसा चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत १६ कि.मी. अंतरावरील मौजा डुमरी कला शिवार शेती फार्मच्या बाजुला दिनांक २५/०६/२०२३ चे १८.०० वा. ते १८.३० वा. दरम्यान यातील १) आरोपी नामे— शैलेश कडबे, रा. गणेश नगर, कन्हान २) मोटरसायकल क्र. एम. एच. —४०/बी.व्ही.—४८९७ चा चालक ३) मोटरसायकल क्र. एम. एच. —१५/जे. ३३९५ चा चालक ४) मोटरसायकल क्र. एम. एच. —४०/सी.जी.—४८९७ चा चालक यांनी अवैधरीत्या वेकोली क्षेत्रातुन कोळसा चोरून सदर कोळसा आरोपी शैलेश कडबे याचे कोळसा टालमध्ये आणुन खरेदी विक्री करतांना मिळुन आल्याने घटनास्थळावरून १८ ते २० टन किंमती अंदाजे प्रत्येकी ५,०००/— रू. टन एकूण किंमती अंदाजे १,०००,००/— रू. चा कोळसा चोरी करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— नागनाथ चरणदास खोब्रागडे वय ४६ वर्षे रा. बजाज कॉलनी बाघोडा क्वा. नं. ५४/३ सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपींविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार वरखडे मो. क्र. ९७६३२१५४६५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**